# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६
फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in

जा.क्र. तंशिविकापु/विवि/२०१७/911

दिनांक : 08 MAR 2017

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित संस्था,
पुणे विभाग.

विषय :- वन विभागाच्या महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या संकेत स्थळावर सदस्य नोंदणी करण्याबाबत

संदर्भ :- १.तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.१६/आस्था/संकीर्ण/२०१७/६१ दिनांक ०७.०३.२०१७

२.मा.मंत्री महसूल व वन विभाग यांचे सचिव (वर्ने)यांचे अर्ध शासकीय पत्र क्र.सावयी-२०१६/प्र.क्र.१३३/फ-११ दिनांक २१.०१.२०१७

३.मा.मंत्री वित्त आणि नियोजन ,वने यांचे पत्र क्र. मंत्री/वि.नि.व वने /नॉट/१३१ दिनांक ३१.०१.२०१७

उपरोक्त विषय व संदर्भानुसार जागतिक तापमानातील वाढ आणि ऋतुबदल या पार्श्वभूमीवर आणि राज्यातील वनक्षेत्र २०% वरून ३३% पर्यंत नेण्याचा भाग म्हणून,वृक्षारोपणाची गती तुट्र न देता,त्यामध्ये सातत्य ठेवावे,असा निर्णय शासनाने घेतलेला आहे.त्यानुसार पुढील तीन वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

नियोजित ५० कोटी वृक्षारोपणाचा व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाद्वारे जन चळवळीत रुपांतरीत करून यशस्वीरित्या राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. यासाठी "महाराष्ट्र हरित सेना "स्थापित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य म्हणून नोंदणी करण्यासाठी greenarmy.mahaforest.gov.in या संकेत स्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेत स्थळावर दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत किमान १ कोटी लोकांनी ,स्वयंस्फूर्तीने स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाचे सदस्य म्हणून नोंदणी करावी असे अपेक्षित आहे. ग्रीन आर्मीचे सदस्य असलेल्या सभासदांना वृक्ष लागवड,संगोपन,वन व वन्यजीव आणि वन विभागातील संबंधित क्षेत्रांमध्ये आपले योगदान देता येईल. तसेच या उपक्रमात उत्तम काम करणा-या सभासदांना बक्षीस योजनाव इतर सवलतीद्वारे सन्मानित करण्याची योजना विचाराधीन आहे.

नोंदणीची पद्धत अत्यंत सोपी असून वर नमूद संकेतस्थळावर आवश्यक माहिती भरल्यानंतर सभासद नोंदणी झाल्याचे आणि त्यानुसार प्रमाणपत्र सिस्टीममध्ये तयार होऊन सध्याच्या मेल आयडीवर आणि एसएमएसवर पाठविले जाईल. तरी आपण सदर पत्र आपल्या संस्थेतील सर्व कर्मचारी,अधिकारी व विद्यार्थ्यांच्या नजरेस आणून देऊन त्यांना महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य नोंदणी करण्याबाबत आवाहन करावे व या लोकोपयोगी कार्यात आपला सहभाग नोंदवावा.

प्राचार्य - सर्व विभाग प्रमुखांना प्रसारित करावे
9/3/17

सही/- 8/3/17
सहसंचालकाकरिता
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

College website वर "Invitation to all Students & Staff to enroll as Member of Maharashtra Harit Sena" या शीर्षकाखाली प्रसिद्ध करून link देण्यात यावे - प्राचार्य

Govt. C.O.E. Awasari
Inward No. 1792
Date: 14 MAR 2017